**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**

**जावक क्र. : व.वि.श.म./ /**
दि.२८/०४/२०२६

## २८८ वा "वसई विजयोत्सव" दि.०१ मे ते ०३ मे,२०२६ या कालावधीत साजरा होणार

वसई विरार शहर महानगरपालिका आयोजित वसई तालुका कला-क्रीडा विकास मंडळ व वसई विजय स्मारक समिती यांच्या सहकार्याने २८८ वा "वसई विजयोत्सव" जंजिरे वसई किल्ला, वसई गाव येथे शुक्रवार दि.०१ मे,२०२६ ते रविवार ०३ मे, २०२६ या कालावधीत साजरा केला जाणार आहे.
प्रथेप्रमाणे मशाल यात्रेला प्रारंभ शुक्रवार दिनांक ०१ मे, २०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता वसई ॲडव्हेंचर फाऊंडेशन यांच्या सहकार्याने श्री वज्रेश्वरी योगिनीदेवी मंदिर, वज्रेश्वरी येथून सुरु होईल व ती पारनाका, वसई गांव पर्यंत मशालयात्रा बाईक रॅलीद्वारे येईल. हिच मशालयात्रा पुढे सायं.५.०० वाजता पारनाका ते वसई किल्ला स्मारकापर्यंत ढोलपथक, लेझीमपथक यांसह प्रस्थान करेल. यावेळी पारनाका, दिपमाळ व वसईचा किल्ला येथे पारंपरिक युद्धकला प्रात्यक्षिके - शस्त्र चालविण्याची प्रात्यक्षिके यामध्ये तलवार, लाठी काठी, भाला, परशु, दांडपट्टा, पाश, काट्यांचे गोल, आगीचे चक्र, आगीच्या बनाट्या इ.सादर केले जातील. पारंपरिक वेशभुषेत सहभागी होणाऱ्या वसईकर नागरिकांच्या सहभागाने पुढे जाणाऱ्या या मशाल यात्रेची ही प्रमुख आकर्षणे राहणार आहेत.

सायंकाळी ६.०० वाजता मान्यवरांच्या हस्ते गौतमबुद्धांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात येईल. तसेच सायंकाळी ६.१५ वाजता मान्यवरांच्या हस्ते श्रीमंत नरवीर चिमाजी आप्पा यांच्या अश्वारूढ पुतळ्याचे पूजन व त्यांस पुष्पहार अर्पण केले जाईल. यानंतर सायंकाळी ७.०० वाजता विशाल डान्स ग्रुप, उमेळमान वसई तर्फे "महाराष्ट्र दर्शन" या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.
शनिवार दिनांक ०२ मे, २०२६ रोजी सायंकाळी ६.०० वाजता "शिवरायांचे संरक्षण व्यवस्थापन " या विषयावर व्याख्याते सुनिल कदम यांचे व्याख्यान शस्त्रप्रदर्शन मंडपात आयोजित केले असुन यामध्ये पीपीटीच्या सहकार्याने ते माहिती देणार आहेत. सायंकाळी ०७.०० वाजता नंदेश उमप निर्मित लोकशाहीर विठ्ठल उमप थिएटर प्रस्तुत "मी मराठी" या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.
रविवार दिनांक ०३ मे, २०२६ रोजी सकाळी ०६.३० ते सकाळी १०.०० वाजेपर्यंत इतिहास अभ्यासक 'श्रीदत्त राऊत' यांसोबत जंजिरे वसई किल्ला सफर व मार्गदर्शनपर भटकंती कार्यक्रम होईल व सायंकाळी ०७.०० वाजता मोहिनी नृत्य कला केंद्र प्रस्तूत, पदन्यास बॅले ग्रूप निर्मित, "लोककल्याण राजा अर्थात शिवदर्शन" या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

विजयोत्सव कालावधीत दररोज सायं.०४.०० ते रात्री १०.०० वाजेपर्यंत लहान मुलांसाठी बालजत्रा, वसईतील पारंपारिक खाद्य पदार्थांची मेजवानी असलेला खाद्यमहोत्सव असणार आहे. यासोबतच शिवकालीन, मोगल, मराठा व ब्रिटीशकालीन तलवारी, भाले, बाण, तोफगोळे, बंदूका इ. ५०० पेक्षा जास्त शस्त्रांचे प्रदर्शन, रायगड, प्रतापगड, सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग या युनेस्को प्रमाणित शिवदुर्ग प्रतिकृती, शिवकालीन नाणी व मोडी लिपीतील पुरातन दस्तावेज, शिवकालीन आरमार प्रदर्शन यामध्ये शिवरायांच्या काळातील आरमारातील २३ जहाजांच्या पाण्यावर तरंगत असल्याची अनूभुती देणाऱ्या प्रतिकृती इत्यादींच्या प्रदर्शनाच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

२८८ व्या वसई विजयोत्सवा निमित्त आयोजित कार्यक्रमांना विनामुल्य प्रवेश असून सर्व नागरिकांनी या विजयोत्सवात सहभागी होऊन इतिहास जाणून घ्यावा तसेच कार्यक्रमांचा आनंद घ्यावा असे आवाहन महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे.